



म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २७६८

REFBK-0023657
REFBK-0023657

संदर्भ काव्य

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४६८
दा. क. २३६५८
काव्य ५११५
मुंबई शाखा (स्थळ प्रत)

संदर्भ काव्य
२४६८
२३६५७
५११।८२

# मोनमंथा

# सोनसंध्या

( कवितासंग्रह )

रामकुमार

REFBK-0023657
REFBK-0023657

ज्योती प्रकाशन

प्रकाशक :

**द. रा. किल्लेकर**
ज्योती प्रकाशन
' रामस्मृती '
कामत गल्ली. बेळगाव

□

पहिली आवृत्ती :
गुढी पाडवा,
२६ मार्च, १९८२

□

सर्वाधिकार :

© **सौ. मंगला द. किल्लेकर**
' रामस्मृती '
कामत गल्ली, बेळगाव

□

मुद्रक :

**एस्. जे. हुंद्रे**
रवि-मुद्रणालय
कडोलकर गल्ली, बेळगाव
फोन : २३०७९

□

मुखपृष्ठ :
चित्रमहर्षी के. बी. कुलकर्णी
खडेबाजार, बेळगाव

□

मुखपृष्ठ छपाई :
**नवरंग मुद्रणालय**
कोल्हापूर

**मूल्य : वीस रुपये**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि
संस्कृती मंडळाच्या नवलेखक
अनुदान योजने अंतर्गत.

## आई ....!

आज आठवतो फक्त
तुझ्या लेकरांवरील
वात्सल्याचा
अपार वर्षाव....!

## बाबा ....!

माझी पहिली कविता
प्रसिद्ध झाली तेव्हा
आमच्या ' दत्तु 'ची कविता म्हणून
किती अभिमानाने
आपल्या मित्रांना दाखविलीत... ...

तुमच्या 'दत्तुचं' कवतिक करायला
आज तुम्ही दोघेही हवे होतात... ....

पूर्व प्रसिद्धी

मनोहर, वसंत, वाङमयशोभा, साधना, प्रतिष्ठान, स्वराज्य, युगदिप, पुरुषार्थ

आणि

मराठवाडा, तरुण-भारत (बेळगांव), राष्ट्रवीर, वीरवाणी, रणझुंझार दिवाळी अंक.

# प्रस्तावना

बेळगावचे कवी श्री. रामकुमार यांचा हा पहिला वहिला काव्यसंग्रह महाराष्ट्र शासनाच्या अनुदान योजनेमुळेच केवळ रसिकां पुढे येऊ शकलेला.

रामकुमार यांच्या गेल्या वीस वर्षातील कविता यात घेतल्या आहेत. या वीस वर्षात मराठी कवितेने दोन वादळे पचविली आहेत. श्री. मर्ढेकर यांच्या प्रेरणेने कविता नव्या प्रतिमा, नवी रचना यांनी नवी होऊन गेली. आणि त्यानंतर गेल्या दहा वर्षातील प्रस्थापितां विरुद्धच्या. प्रक्षोभ हा स्थायीभाव असलेल्या कविता. विचारगर्भ, अन्यायाची चीड व्यक्त करणाऱ्या. भाषेचा, रचनेचा त्यासाठी मुलाहिजा न ठेवणाऱ्या. या कवितांनी कविता पुन्हा बदलू लागली पण या सोनसंध्येला या वादळांनी जणू स्पर्शही केलेला नाही.

मोठ्या पाषाणाच्या आड सोनावळीचे फूल कसे निवांत रुमझुमत असते. त्याच्या पिवळ्या कोमल पाकळ्या, नाजूकपण, आपले लक्ष गेले तरच आपल्याला दिसायचे. पण आपण लोकांना दिसावे ही जाणीव नाही. जणू बाह्यजगाची त्याला कल्पनाच नाही. तशी ही सोनसंध्या. या बाहेरील वादळापासून दूर राहिली आहे. आपल्याशीच रमली आहे. आत्मनिमग्न आहे.

श्री. रामकुमार हे बेळगावचेच. शहराजवळ थोडी शेती असलेल्या, साधारण परिस्थितीतील कुटुंबात वाढलेले. धार्मिक ग्रंथाचे वाचन, भजनाच्या परंपरागत संस्कारांत वाढलेले. प्राथमिक शाळेत सहाव्या इयत्तेत शिकत असतानाच याना कवितेची, कविता रचण्याची गोडी लागली. शाळेतील क्रमिक पुस्तकांतील कविता आणि वडीलधाऱ्यांच्या तोंडची भजने, आरत्या या गोष्टीमुळेच ही आवड लागली असावी. कविता वहीत लिहून ठेवायची जशी आली तशी. एवढेच याना माहीत होते.

सातवी पास झाल्यावर ते येथील मराठा मंडळच्या माध्यमिक शाळेत शिकू लागले. या शाळेत याना यावेळी प्रसिद्ध कवी श्री. शाताराम रामचंद्र हे शिक्षक म्हणून लाभले. त्यांनी या मुलातील कवी ओळखला. त्याची वही पाहिली. यमक, गण, वृत्ते इ. रचना समजाऊन दिली. कवितेबद्दल कसा विचार करावा हे शिकविले. नवीन लिहिलेली कविता तपासून, समजाऊन दिली. आणि विशेष म्हणजे शाळेच्या वाचनालयातील पुस्तके वाचण्यासाठी मार्गदर्शन केले. त्यांच्या या शिकवण्याने हा विद्यार्थी खरोखरच कवितेत आणि कवितेच्या वाचनात रमून गेला. हाच खरा आनंद, असे समजला.

पण हे मार्गदर्शन त्याला फार काळ लाभले नाही. दोन तीन वर्षांतच श्री शांताराम रामचंद्र दुसरीकडे गेले आणि हा कवी एका दृष्टीने पोरका झाला. त्याच्या मनोवृत्ती मिटल्यासरख्या झाल्या. त्यानंतर त्यानी कुणाचे मार्गदर्शन घेतले नाही. कुणाला कविता दाखविली नाही. निमूटपणे वहीत लिहायची आणि ठेऊन द्यायची. वाचनही जे पुस्तक मिळेल ते वाचायचे. असा त्यांच्यातील कवीचा एकाकी प्रवास सुरू झाला.

मॅट्रिकची परीक्षा होताच रामकुमारना घरच्या परिस्थितीमुळे आणि वाढत्या जबाबदारीमुळे लगेच नोकरी धरावी लागली. पुढे कॉलेजचे शिक्षण घ्यावे, प्राध्यापक व्हावे. खूप वाचावे, खूप लिहावे हे त्यांचे विद्यार्थी दशेतील स्वप्न साकारले नाही. त्या कोवळया मनात हे वैफल्य कुठेतरी घर करुन राहिले ते अजूनही.

नोकरी मिळाली ती बोर्डाच्या शाळेत शिक्षक म्हणून, केवळ इतर कोणत्याही नोकरीपेक्षा शिक्षकाला सुट्या वगैरे अधिक असतात. वाचना, लेखनाला अधिक निवांतपण. मिळतो; म्हणून केवळ त्या नोकरीत ते आजवर असावेत या मनाविरुद्धच्या व्यवहाराला जवळ केल्याने त्यांच्या मनोवृत्ती आणखीच मिटल्या. पण काव्यलेखन विरंगुळा आणि छंद म्हणून सुरु राहिले.

१९४९ साली त्यांची पहिली कविता श्री अंबिके यांच्या 'माधुरी' या मासिकात प्रसिद्ध झाली. आणि नंतर केव्हातरी, कुठल्यातरी मासिकात 'रामकुमार' या नावाने त्यांची कविता येऊ लागली.

एकदा येथील 'तरूण भारताच्या' अंकात मी एक कविता वाचली. ऑफिसमधील माझ्या सहकाऱ्यांना विचारले " हा बेळगांवला रामकुमार कोण हो ? चांगली कविता करतो. ते म्हणाले " बाई, हा आपल्याच कॉलेजमधे आहे. 'किल्लेकर'

मी ते नाव ऐकून चकितच झाले. शिक्षकाला जरूर असणाऱ्या पदविकेसाठी ते आमच्या मराठी ट्रेनिंग कॉलेजमध्ये त्यावेळी होते.

या विद्यार्थ्याचे अक्षर कसे मोत्याच्या सरा सारखे. परीक्षेत मार्कही चांगले. पाठ स्वयंस्फूर्त पण चांगला घेत. एक हुशार विद्यार्थी. पण अतीशय अबोल, कुणातही न मिसळणारा, कोणत्याही कार्यक्रमात भाग न घेणारा. आपल्याच तंद्रीत असणारा. उदास.

हे सर्व लिहिले एवढ्यासाठी की कवीच्या मनाचा हा स्थायीभाव आणि त्याची काव्यशक्ती यांचा काही संबंध आहे का हे पाहण्यासाठी. तीही त्यांच्याच प्रमाणे मिटलेली. कवि संघर्षापासून दूर राहणारा. संघर्षापुढे कासवा सारख्या सर्व शक्ति मिटून घेणारा. मनात दुखावलेला; पण त्यात क्षोभ, उत्कटता न यावी याचा प्रयत्न करणारा. आणि कर्तव्यासाठी तत्पर असणारा.

त्यांची कविताही तशीच. आत्ममग्न. अतिशय सौम्य. उदास.

या सोनसंध्येत गेल्या वीस वर्षातील घडामोडींचा वास वाराही नाही तो त्यामुळेच.

आपल्या काव्याविषयी ते ' आज कुठे ती बेहोषी ' या कवितेत लिहितात–

" उसवुनी एक एक
टाका हृदयाचा
साज शेला विणियेला
असा भावनांचा
हिच्या एका प्राप्तीसाठी
प्राशिले जहर
दृश्य लौकिक सुखाला
ठोकरीले दूर,"

कोणतीही अनुभूति त्यांच्या कवीमनात प्रक्षोभ, उत्कटता निर्माण करीत नसेल असे नाही. पण त्यांच्या कवितेने एक धनुष्यरेषा आखून घेतली आहे.

नको नको ते पाहिले
नको नको ते साहिले
मणामणाचे कुलूप
आणि ओठाना घातले

किंवा

मिटलेली विश्वकळी
तिमिराचा डोह खोल
अंतरात लाख शब्द
आणि असा मी अबोल

किंवा

" दंभ खोटा, मान खोटा. सर्व खोटे येथले
मोतिया वाचून येथे रिक्त सारे शिंपले
परततो आता पुन्हा मी, भावविश्वी माझिया
लोळतो स्वानंद साम्राज्यी सुखाने लिलया."

किंवा

कुणी भेटता मार्गात
जुळवावे शब्द ओठी
आणि मुक्याच रहाव्या
खोल मनातील गाठी.

अशी ही त्यांची कविता. जाणिवेला शब्दरूप घेताना सौम्य, सोशीक, व्रती अशी होते.

कवी देवाला मानतो. त्या अगाध शक्तीवर त्याची निष्ठा आहे. 'आणि तरीही प्रभू का ?'' "अनंत हस्ते" ही एक प्रकारची स्तोत्रेच आहेत. पण शेवटी ते विचारतात,

**तुझ्या नाम कीर्तनाचे**
**ज्यानी प्राशिले अमृत**
**तेच देव होऊनीया**
**उभे ठेले राऊळात**
**अगा भगवंता तुझी**
**नको मला सोयरीक**
**जे जे पुढे गेले त्यांची**
**शुद्ध राहू दे ही वाट**

हे मात्र अंतर्मुख करणारे. मनाला भिडणारे असे आहे.

रामकुमार यानी आपल्या जुन्या घराच्या दोन आठवणी दिल्या आहेत. त्या चित्रमय आहेत.

'स्मृती' या कवितेतील गवताचा भारा घेऊन येणाऱ्या आजीच्या भोवतीचे आसमंत सुंदर रेखले आहे. तसेच 'आठवते' या कवितेतील मुसळधार पावसाचे पाणी घरात शिरते ती गंमत वाटते. भजन सुरू तोपर्यंत दिवा बिन तेलाचा जळत राहतो हा गूढ अनुभव, आणि भजनाचे आजूनही चौसोपी चिरेबंदी घरांतही घुमत असलेले संस्कार. हे सर्वच कसे सुंदर आहे. मला मात्र कविता जरा लहान असती तर बरे झाले असते असे या दोन्ही कवितांबद्दल वाटते.

या सोनसंध्येत कांही भावगीतात जमा होणाऱ्या कविताही आहेत. 'उदास राधा', 'रंगोत्सव' इ. कविता. नेटकी रचना हेच त्यांचे वैशिष्ठ्य. एक संगीतिका आहे. ती मुलांसाठी असावी.

रामकुमार यांची कविता जरा मोकळी वाटते ती प्रीतीचे भाव व्यक्त करताना. पुरुषमंडळी बाहेर गेल्यावर मराठ मोळा गृहिणीने माथ्यावरचा पदर जरा मागे सारावा इतकीच मोकळी. या प्रेमाच्या अनुभूतीवरील कवितेत झोकून दिल्याची उत्कटता जाणवत नाही. तशी मनोभंगाची दारूण

व्यथाही नाही. त्यानी घालून घेतलेल्या धनुष्यरेषेचा हा परिणाम.

'सर्वस्वाचे दान', 'खुशाल जा पण' 'ध्यास तृप्तीचा' आलीस अशी कीं', 'ही रीत तुझी' या कविता याची साक्ष देतील.

पण ही कविता पहा –

**प्रश्नही गेला, गेले उत्तर**
**फक्त राहिली**
**उत्तरातली भिणभिणणारी रात**
**जपत मनातिल तुझ्या स्मृतींची**
**संथ कापरी ज्योत**

'भेट घडावी' मधील या ओळी–

**"दोन दिशांच्या वळणावर पण**
**नव्या उद्याच्या भलत्यासाठी**
**आतुर जीव झुरावा"**

त्याच प्रमाणे 'शब्द' 'फक्त तेव्हां' विराणी' या कविता वाचल्या की कविची प्रतिभा या कोंडलेल्या सौम्य-पणातून बाहेर येऊ लागली आहे असे वाटते. या कविता मला आवडल्या. कदाचित,

**"किती दिवसांनी आज**
**कसे हलके वाटते**
**तनु तरल होऊनी**
**पिसावरी तरळते."**
**'आता नवी क्षितिजे**
**आता नवीन आकाश**
**वेध घ्यावया नभाचा**
**पंख फुटले मनास**

ही कविता हे या मुक्तपणाच्या शकुनाचे तोरण तर नसेल ?

अशी सौम्य कविता लिहिणाऱ्या कवीचे जीवनाचे सुख-स्वप्नही किती साधे आहे ! पहिलीच कविता–" अशी असावी

दुपार" ही संबंध देण्याचा मोह होतो. इतकी त्या स्वप्ना-सारखीच साधी, सोपी, सरळ आणि भाबडी आहे.

हे एके काळचे त्यांचे स्वप्न आता साकारले आहे. त्यांच्या प्रतिभेने बंधने मानण्याचे आता नाकारण्याचे ठरवले आहे. वर दिलेल्या कवितेवरुन ते दिसतेच. बेळगावमधील एक मातबर जुनी संस्था 'सार्वजनिक वाचनालय' या संस्थेच्या कार्यकरणीतही ते आहेत. पुस्तके शोधत जाणाऱ्या 'त्या' मुलाला आता पुस्तकाच्या गराड्यात पाहताना मनाला फार सुख होते.

या सोनसंध्ये नंतरच्या कविता निरनिराळ्या दालनांतून विमुक्त विहरणाऱ्या असतील याच्या खुणा या सोनसंध्येतच सापडतात.

**अशी सुभग सोज्वळ**
**सोनसंध्या कार्तिकीची**
**माझ्या स्वप्न–सावल्यांचा**
**सांधा.... सांधा जुळणारी**

**– इंदिरा संत**

## ऋणनिर्देश

हा माझा पहिला वहिला कवितासंग्रह, महाराष्ट्र शासनाच्या अनुदानाने रसिकांसमोर येत असलेला.

माझ्या कवितेवर प्रेम करणाऱ्या अनेक सुहृदांच्या आठवणींनी आज मन कसं तुडुंब भरलं आहे.

त्यातल्या त्यात माझ्या कवितेवर व माझ्यावर पित्याच्या वत्सलतेने प्रेम करणारे गुरुवर्य प्राचार्य शांताराम रामचंद्र, श्री. वि. बा. आसबे व श्री. वि. गो. साठे यांचे ऋण विशेष.

माझ्या कवितेविषयी आस्था आणि अभिमान बाळगणारे...... माझा लहान भाऊ कवी किनारा, मेहुणे श्री. महादेवराव चौगुले, सन्मित्र संतराम पाटील, आत्माराम सावंत, सुभाष सुंठणकर आणि सार्वजनिक वाचनालयाच्या कार्यकारिणीतील माझे जुने–नवे सहकारी, या सर्वांच्या सुगंध-शीतल स्नेहाचा मी सदैव ऋणी आहे,

सुप्रसिद्ध कवयित्री श्रीमती इंदिरा संत यांचे आभार कोणत्या शब्दात मांडावे... प्रस्तावनेबाबत दूरध्वनीवरून त्यांच्याशी मी बोललो.... त्याच क्षणी त्यांनी होकार दिला. त्यांच्या प्रेमळ व आतिथ्यशील स्वभावाचा प्रत्यय नेहमीच येत असतो. या संग्रहाला त्यांची प्रस्तावना लाभली हे या

संग्रहाचं मोठेपण. त्यांचे ऋण सदैव शिरी बाळगण्यातच आनंद !

ज्येष्ठ वाङ्मयसमीक्षक व जाणकार रसिक श्री. कृ. बा. मराठे यांनी माझ्या कवितेवर मार्मिक अभिप्राय दिल्याबद्दल त्यांचेही आभार !

चित्रमहर्षी श्री. के. बी. कुलकर्णी यांचा विशेष परिचय नसताना सुद्धा अत्यंत आपुलकीने संग्रहाच्या मुखपृष्ठासाठी उत्कृष्ठ चित्र काढून दिल्याबद्दल त्यांचे विशेष आभार !

महाराष्ट्र मुद्रण परिषदेचे; उत्कृष्ट छपाईचे सतत तीन वर्षे प्रथम पारितोषिक मिळविणारे रवि मुद्रणालयाचे मालक श्री. सदाशिवराव जो. हुंद्रे आणि त्यांचा कुशल कामगार वर्ग; यांच्या कार्यतत्परतेमुळेच हा संग्रह इतक्या अल्पावधीत रसिकांसमोर येत आहे, त्यांचेही आभार !

रसिका ! या कवितेने तुझ्या जीवनातील एक क्षण जरी दिव्यत्वाने उजळून निघाला; तरी मी स्वत:ला धन्य समजेन !

**— रामकुमार**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | अशी असावी दुपार | ९ |
| २. | सर्वस्वाचे दान | ११ |
| ३. | किती दिवसांनी आज | १२ |
| ४. | नाही तुझे नाव | १४ |
| ५. | पोर झाली उफाडयाची | १६ |
| ६. | उदास राधा | १७ |
| ७. | हुरहूर | १९ |
| ८. | धन्य दुष्काळा | २१ |
| ९. | खुशाल जा पण .... | २३ |
| १०. | प्रश्न | २४ |
| ११. | आज आठवते | २५ |
| १२. | भेट घडावी | २६ |
| १३. | आणि तरीही प्रभु का | २७ |
| १४. | अनोळखी जिवा | २९ |
| १५. | आज | ३० |
| १६. | कळ | ३१ |
| १७. | जेव्हा | ३२ |
| १८. | अनंत हस्ते | ३३ |
| १९. | उष्ण उसासे | ३५ |
| २०. | फितूर | ३६ |
| २१. | ध्यास तृप्तीचा | ३७ |
| २२. | फडफड | ३८ |
| २३. | तंद्रा | ३९ |
| २४. | माझी पाटी | ४० |
| २५. | आलीस अशी का | ४१ |
| २६. | मारवाड कन्या | ४३ |
| २७. | अवखळा | ४५ |
| २८. | होरी | ४६ |
| २९. | सरले वादळ | ४७ |
| ३०. | या उलटचावर | ४८ |
| ३१. | अबोल | ४९ |
| ३२. | स्वागत | ५० |
| ३३. | श्रावणराणी | ५१ |
| ३४. | स्मृती | ५३ |
| ३५. | मोहवेल | ५६ |
| ३६. | उदकाडी | ५७ |
| ३७. | करुण कहाणी | ५८ |
| ३८. | सोयरीक | ५९ |
| ३९. | किमया | ६० |
| ४०. | श्वासच होता | ६१ |
| ४१. | लोभ | ६२ |
| ४२. | अन्तर्नाद | ६३ |
| ४३. | शब्द | ६४ |
| ४४. | फक्त तेव्हा | ६५ |
| ४५. | अतृप्त मी | ६६ |
| ४६. | कागदाची फुले | ६७ |
| ४७. | रंगोत्सव | ६९ |
| ४८. | असा कधितरी | ७० |
| ४९. | आज कुठे ती बेहोषी | ७१ |
| ५०. | कंटकाच्या या जगी | ७३ |
| ५१. | डंख | ७४ |
| ५२. | थांबू नको | ७५ |
| ५३. | सोनसंध्या | ७६ |
| ५४. | ही रीत तुझी | ७७ |
| ५५. | विराणी | ७८ |
| ५६. | लाल मोहळ | ७९ |
| ५७. | आठवते | ८० |
| ५८. | हलाहल | ८३ |
| ५९. | शिव तुझे नाम (संगितिका) | ८४ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२७६८
दा. क्र. २-३६५७५
काव्य ८११
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## अशी असावी दुपार-

अशी असावी दुपार सोज्वळ
ढगात अर्धा सूर्य दडावा
शान्त-स्निग्धतर त्या किरणांचा
प्रकाश भूमीवरी पडावा !

अंगणातल्या चाफ्यावरती
पक्षीगण येऊन बसावा
किलबिल किलबिल मंजुळ स्वर तो
वातावरणी भरुन रहावा.

रस्त्यावरचा गोंधळ.... गडबड
दोन घडीभर शांत रहावी
तनूमनाला सुखविणारी
झुळुक गारशी येत रहावी.

अशाच वेळी उरकुनि घ्यावे
सात्विक, साधे भोजन रुचकर
अंगणात अन् फेऱ्या घालुनी
तृप्तीची वर द्यावी ढेकर.

तसेच यावे खोलीमध्ये
चौपाईवर अंग टाकुनी
टिपॉयवरचा काव्यग्रंथ अन्
नजरेपुढती घ्यावा उघडुनि.

आणि रेशमी तिच्या हातची
चिकणि सुपारी मुखी घोळवित
मिटून घ्यावी हळुच पापणी
एक कविता वाचित-चघळित.

## सर्वस्वाचे दान–

सारे सोडून इथले
येते अशीच धावून
जन-नेत्र चुकवून !

गूढ नि:शब्द शांतता
स्तब्धतेने पहुडली
तिमिराच्या पंखाखाली !

तुझ्या गवाक्षी दुरुन
दीप–प्रकाश दिसतो
जीव माझा हरखतो !

चोर पावलांनी हळू
तुझ्या समीप मी येते
उरी घेउनी गुपिते !

मेजावरी दिसतात
दोन, चारच कपटे
अर्ध्या मुर्ध्या कवितेचे !

माझी लागता चाहूल
घेसी बळेच ओढून
जाते मन बावरून !

बंडखोरी तुझी मला
सारी कळते, वळते
आपसुक मी फसते !

दीप मालवून झणी
तुझ्यापुढे होते लीन
आणि सर्वस्वाचे दान !

## किती दिवसानी आज–

किती दिवसानी आज कसे हलके वाटते
तनु तरल होउनी पिसापरी तरळते !

भार हृदयावरचा
नको नकोसा जो होता
दूर जाहला तो आज
दूर जाहली ही चिंता

आता आनंद.... आनंद आनंदाला ये भरते
किती दिवसानी आज कसे हलके वाटते !

बांध फुटला मनचा
जीवित्वा ये प्रवाहित्व
उंच स्वराने हाकारी
माझे आभिमानी स्वत्व

आता साकार होतील माझ्या मनीची इप्सिते
किती दिवसानी आज कसे हलके वाटते !

ग्रिष्म संपला... संपला
वसंताची घुमे शीळ
मृदु कराने खुणावी
चैत्र पालवी कोमल

आता दिशादिशातुनी कोकिळेची 'कुहूऽऽ' गीते
किती दिवसानी आज कसे हलके वाटते !

नको.... नको ते पाहिले
नको... नको ते साहिले
मणामणाचे कुलुप
आणि ओठाना घातले

स्वैर, बेफाम मी आता माझे वारीयाशी नाते
किती दिवसानी आज कसे हलके वाटते !

आता नवीन क्षितिजे
आता नवीन आकाश
वेध घ्यावया नभाचा
पंख फुटले मनास

आता नवीन जीवन साद देऊन घालते
किती दिवसानी आज कसे हलके वाटते !

## नाही तुझे नाव–

सभागृह पूर्ण झाले
आज त्याचे उद्घाटन
जमे विद्वानांचा मेळा
आले अध्यक्ष महान !

स्वागताचे गीत झाले
हार, तुऱ्यांचे अर्पण
अत्तराच्या सुवासाने
दर्वळले काही क्षण !

थोरा, मोठ्यांचे संदेश
कुणि वाचिले तोऱ्यात
थोडा दर्प... थोडी चिंता
अहवाल वाचनात !

झाले उद्घाटन, आणि
विद्वत्पूर्ण हो भाषण
हंशा, टाळ्या एकेवेळी
थोडे उत्साहाचे दान !

जो तो करितसे स्तुती
आपुलीच.... आपुल्यांची
प्रत्येकाच्या अंगावरी
वस्त्रे परीट घडीची !

अरे पण...

रात दिवस राबून
घाम भाळीचा गाळून
ज्याने बांधला इमला
त्याचे कुठे हो दर्शन ?

झाली भाषणे, जाहला
कार्यकर्त्यांचा गौरव
आभाराच्या यादीतही
अरे ! नाही तुझे नाव
नाही तुझे नाव !

## पोर झाली उफाडयाची–

काल परवाची पोर आज पातळात आली
गौर, पुष्ठ दंडामध्ये चोळी रुतून बसली !

खुले गालावर लाली डोळीयात आली लाज
अंगांगावरी चढला नव्या नवतीचा साज !

तुझा नाहीच तो दोष, किती सावरीशी पोरी
उरावरचा पदर आज अस्थिर ग भारी !

हरिणीची चपळाई नाही राहीली चालीत
दचकशी सशापरी भिरी भिरी भोंती पहात !

करातल्या कंकणांची नादमधूर किण्किण
काही सुचवी आगळे आज राहून राहून !

लपविता लपवेना कसे लपायचे तरी
नव्या दिवसांच्या संगे नवा बदल अंतरी !

ओठातले गूज ओठी नाही फुटत ते जनी
कुळवंताची तू पोर ठेव मनातले मनी !

पोर झाली उफाडयाची माऊलीच्या मनी चिंता
मार्गशीर्ष आला दारी हासे मांडवात लता !

## उदास राधा –

राधिका एकटीच उपवनी
दूर राहिला कृष्ण–सखा दाटले अश्रु लोचनी !

करतळव्यावर कपोल ठेवुनि
दूर कुठे तरी नजर लावुनी
तरुच्या छायेखाली बसली उदास ही कामिनी
राधिका एकटीच उपवनी !

वक्षावरचा पदर गळाला
भान तयाचे नाही तिजला
गुंग जाहले व्याकुळ मानस श्रीहरीच्या चिंतनी
राधिका एकटीच उपवनी !

मावळले ओठावर हासू
तेथ खिन्नता लागली दिसू
पायामधले पैंजण पडले स्वैर अंग टाकुनी
राधिका एकटीच उपवनी !

संथ वाहते सरिता यमुना
मूक जाहल्या कोकिल ताना
स्वर मुरलीचा ये न कोठुनि पसरित मधु मोहिनी
राधिका एकटीच उपवनी ?

नाजुक. नूतन हें कोमलपण
निर्माल्यापरि गेले सुकून
मूकपणाने जळतें अंतर विरहदग्ध होउनी
राधिका एकटीच उपवनी !

उदास राधा.... उदास मधुवन
उदास गोकुळ---- उदास जीवन
चराचरावर उदासीनता राहियली दाटुनी
राधिका एकटीच उपवनी !

ऊठ राधिके, खंत कशाला
' राधा-मोहन ' एक जाहला
चिरंजीव तू- तोहि चिरंजिव विश्वाच्या कणकणी !
राधिका एकटीच उपवनी !

## हुरहूर–

आज बाई सैल झाले    बाजूबंद दंडातले
हुरहुरे जीव माझा    प्राणनाथ नाही आले !

माघातल्या आणाभाका
अधुऱ्याच फाल्गुनात
चैत्र पालवला तरी
उदास हे माझे चित्त

वैशाखीच्या उन्हाळ्यात    गोरे गाल कोमावले
हुरहुरे जीव माझा    प्राणनाथ नाही आले !

सख्या, आपुल्या प्रातीचा
नाही रंगला रे विडा
हळदावे अंग कधी
कधी भरशील चुडा

चंपकाच्या केशरात    मन गुंतुनी राहीले
हुरहुरे जीव माझा    प्राणनाथ नाही आले !

कधी नाही माळीयला
फूल गजरा वेणीत
वेल चालली सुकून
गंध गोठला कळ्यात

तुझ्या स्पर्श-सुखासाठी तन-मन आसावले
हुरहुरे जीव माझा प्राणनाथ नाही आले !

दिवसाच्या कामधामी
नाही लागत रे चित्त
तुझ्या स्मृतीत सरते
वेडी विरहिणी रात

चंद्राचिया चांदण्यात अंग अंग माझे पोळे
हुरहुरे जीव माझा प्राणनाथ नाही आले !

कुणितरी कळवा हो
प्राणसख्याला बोलवा
कुठवरी धीर धरू
किती समजावू जीवा

काय करू तरी बाई वाऱ्यावरी श्वास चाले
हुरहुरे जीव माझा प्राणनाथ नाही आले !

## धन्य दुष्काळा–

देहू गावचा तुकया
एक सामान्य माणूस
दोन बायकांचा धनी
चार लहानगे घास.

गुरे, ढोरे दावणीला
घरी वाणीयाचा धंदा
नित्य तोटयात व्यापार
गडी सचोटीचा बंदा !

आला दुष्काळ एकदा
सूर्य तापला, कोपला
मेघखंड ना कुठेही
नेत्री प्राण झाले गोळा !

गेले आटून जीवन
नदी, नाले ओसाडले
पान... पान गळूनिया
वृक्ष मुंडेभुंडे झाले !

भंगलेली धर्ती.... आर्त–
टाकू लागली निःश्वास
कोंब फुटण्या आधीच
बीज जळाले भूमीत !

नाही चारा— नाही धारा
झाली मोकळी दावण
होते नव्हते सरले
अन्नाचा ना कुठे कण !

अन्न अन्न करुनीया
गेली बायको पहिली
उरल्यांची तळमळ
आले पाहणे कपाळी !

नाही धन.... नाही मान
नाही कोठेच जिव्हाळा
भक्तिलाही डंखणाऱ्या
सभोंती लक्ष इंगळचा !

आता कोठला संसार
तृषा तृष्णेत आटली
गेले जळून षट्‌रिपु
अंगी बाणली विरक्ती !

बद्ध... मुमुक्षु... साधक
संतपद आले अंती
देहभान हरपले
एक विठ्ठलाची भक्ती !

भक्तितून उदया ये
भाव– कवित्व निर्मळ
अंतरात स्फुरणाऱ्या
शब्दां आले वज्रबळ !

धन्य दुष्काळा ! तूच बा
तुका निर्मिला निःसंग
माझ्या माय मराठीला
दिला अक्षर अभंग !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२८६८
दा. क्र. २३६५७
काव्य ५७७१५
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## खुशाल जा, पण–

जाणारच कां ? खुशाल जा, पण–
पदराआडिल धडधडणारे, कंपित, लज्जित काळिज आवर.

बांध बंद तें काचोळीचे
चुरगळलेल्या निऱ्या झटकुनी, ढळलेला तो पदरही सावर

' तसले' पुसुनी गालावरचे
आरशालाही कळू न देता विस्कटलेला भांग सरळ कर !

पूस नयनींची स्वप्निल भाषा
पुसुनि टाक ती हवीहवीशी रोमांचातिल हळवी थरथर !

जाताना पण, कोपऱ्यातल्या
नकोस जाऊ विसरुनि तुझिया नक्षिदार त्या चपला सुंदर !

हे घे पुस्तक अभ्यासाचे
मनातले ते जनांत होता भलते काही होइल नातंर !

आणि उद्या ये; येताना पण–
आत्ताचे हे बिसरुनि सारे पुनश्च होउनि नव रतिमंथर !

## प्रश्न

प्रश्नहि गेला.... गेले उत्तर
फक्त राहिली
उत्तरातली भिणभिणणारी रात,
जपत मनातिल तुझ्या स्मृतीची
संथ कापरी ज्योत !

## आज आठवते –

आज आठवते !
होती वेळ पहाटेची
धुंद सोनेरी स्वप्नांची
कळ्यांचिया अंतरात गीत मोहरत होते
आज आठवते !

चांदण्यात माखलेले
धुके होते दाटलेले
हिरव्याशा पानांवरी दंव हिंदोलत होते
आज आठवते !

खगांचिया कंठांतुनी
उमलता नवी गाणी
तुझ्या पैंजणाचे स्वर कानांवरी आले होते !
आज आठवते !

साज करुन सोनेरी
येतांच तू उषेपरी
उरी काहीसे नवखे चकाकुनी गेले होते
आज आठवते !

शब्द नाही – स्पर्श नाही
धडकत्या उरी ग्वाही
श्वासातून–स्पर्शातून स्फुरली सुगंधी गीतें
आज आठवते !

आज तशीच पहाट
परी मनी धुके दाट
सारे स्मरुन तेंव्हाचे उरी अकारण तुटे
आज आठवते !

## भेट घडावी–

भेट घडावी रोजच
हे ठरलेले
भेटीला पण तसाच काही अर्थ नसावा.

हासूंरुसूच्या फेसामध्ये
खोल मनातिल
शब्द रुपेरी विरघळून जावा.

दोन दिशांच्या
वळणावर पण
नव्या उद्याच्या भलत्यासाठी
आतुर जीव झुरावा !

## आणि तरीहि प्रभू का–

कधी कधी अवचित्
दृष्टी जाता नभाकडे
प्रभू तुझ्या अस्तित्वाचे
झणि उकलते कोडे !

तूच नित्य रंगविशी
धुंद सोनेरी पहाट
तूच विणीसी रात्रीला
चांदण्याची कलाबूत !

फुला पानांतूनी कधी
तुझे घडते दर्शन
नदी, निर्झर, ओढयात
तुझे ऐकू येई गान.

कधी बालकाच्या हास्यी
तुझी झळाळते प्रीत
कधी दाविसी किमया
रमणीच्या भृकुटीत !

सौदामिनीच्या रूपानें
कधी येतोस नटून
रिम्झिम् रिम्झिम्
तुझे ....तुझेच नर्तन !

तुझ्या प्रसादा वाचुनी
एक पान ना हालतें
अंधश्रद्ध माझ्या मना
कधी तेंही रे पटतें.

इथे तिथे, सारीकडे
प्रभु तूच – प्रभु तूच
कणकणांत आढळे
तुझ्या अस्तित्वाचे बीज,

अशी अरूप – सरूप
जाग असताना तुझी
आणि तरीहि प्रभु कां
काही दुःखी – काही सुखी ?

## अनोळखी जिवा

अनोळखी जिवा तुझा
मनास वेध लागला
तुलाच स्वप्नि पाहते
तुझ्यात जीव गुंतला !

तुझ्यामुळेच आज ये
नवीन रूप सृष्टीला
फुलात गंध, आणखी
उषेत रंग दाटला !

कळयांतुनी–फुलांतुनी
तुझेच हास्य ऐकते
क्षणोक्षणी इथे–तिथे
तुझाच श्वास श्वासिते !

तनू मनात माझिया
भरुन राहिलास तू
कळे न कोठुनी ? कसा ?
सुगंध चालला उतू !

जुनेच शब्द कालचे
नवीन अर्थ दाविती
स्वरास कंप लाभता
तुझेच बोल बोलती !

तुझ्या रुपे इथून ये
सुखास आज पूर्णता
तुझ्या मुठीत आमुचे
भविष्य बांदते आता ....!

## आज–

आज डोळयाची पापणी
मिटताही मिटेनाच
जांभईचे आश्वासन
काही केल्या फळेनाच !

इथे .... तिथे भास होतो
एक अमूर्त स्वप्नाचा
आणि जाणवतो श्वास
उमलत्या कुसुमाचा.

नको ... हवी, अशी उरी
अनामिक हुरहूर
प्रश्न टाकला – कोणते
मिळायचे गा उत्तर !

## कळ–

माझ्या अंतरीची कळ
माझी मजला ठाऊक
नको फुलावया तेथे
फूल लिलीचे नाजूक !

कुणि भेटता मार्गात
जुळवावे शब्द ओठी
आणि मुक्याच रहाव्या
खोल मनातील गाठी

कुणि प्रेम देऊ केले
तेथे प्रेमे ओसंडावे
क्षण संपता तसले
मग्न माझ्यात मी व्हावे !

आभाग्याला हात द्यावा
ओसाडीत उमलावे
अंतरीच्या आघाताला
आणि पुनः सज्ज व्हावे !

आगळीच आहे – राहो
माझ्या अंतरीची कळ
तीत शाश्वत आनंद
आणि जीवनाचे बळ !

## जेव्हा–

जेव्हा अर्थाला लाभते
आकाशाची गहनता
मौनी झुरतात शब्द
मुकी बनते कविता !

## अनंत हस्ते–

अनंत हस्ते ठायी ठायी
उधळुनि देशी तू जीवन धन
तव मंगलमय स्पर्शाने प्रभु
अमृतमय हो इथला कण कण !

तूच शिकविली निळ्या नभाला
अथांग मायेची मृदु भाषा
निसर्गहृदयी जागविल्या तू
रसरसणाऱ्या हिरव्या आशा !

रंग, गंध, रस, रूप दिले तू
वृक्ष - लताना, कळ्या - फुलांना
पंख दिले पक्षांना, आणिक
कंठी भरल्या सुरेल ताना !

वर्षाकाली कडाडणारी
चिद्घनचपला तूच निर्मिली
या सृष्टीची रूपकला तू
सहा ऋतूंच्या करी निरविली !

तू रमणीला रूप दिले, अन्
हृदय रेखिले आत कोमला
सुख - दुःखाचा एके वेळी
मळा मनोहर तूच फुलविला !

चंद्र, सूर्य, ग्रहगोल, तारका
असंख्य, अगणित, अगम्य लीला
कणाकणातुनि तूंच उमलशी
गूढतत्व कधि सगुण सावळा !

आदि, अंत तू – स्थिती, गती तू
सर्वसाक्षि, सर्वज्ञ, सखा तू
चित्शक्ती तू – चिदानंद तू
युगायुगातिल स्वरलेकर तू !

औदार्याला तुझ्या न सीमा
साक्ष धरा ही – अंबर साक्षी
तूच निर्मिल्या मनुपुत्रांची
जातकुळी का क्षुद्र .... कुलक्षी ?

## उष्ण उसासे

ग्रीष्म ओकीतसे आग
उभा पर्णहीन वृक्ष
फांदी–फांदी लहडली
गात्र ... गात्र शुष्क, रुक्ष !

तोच नभातुनी आली
भिरी रान पाखरांची
पाने फुटली फांद्यांना
लवलव चैतन्याची !

क्षणभर सजीवले
त्याचे निष्प्राण जीवन
अंगोपांगी पालवले
गर्द निळे चैत्र स्वप्न !

आणि हाय ! क्षणातच
गेली पाखरें उडून
उष्ण उसासे टाकीत
उभा वृक्ष पर्णहीन !

## फितूर

उणा एखादाच शब्द
गेलो असेन बोलूनी
त्याचा इतुका काय ग
राग धरावा तू मनी !

आजच का नेसलीस
नवी साडी चंद्रकळा
आणि चोळीचाही काठ
होता दंडात रुतला !

माळिलीस तू कशाला
गर्द बकुळी मादक ?
तुझी नजरही होती
आहे त्याहुनी भेदक !

मेंदी रंगलेली नखे
गाल फुगीचा इशारा
उरी तरंग उठवी
तुझ्या पदराचा वारा !

अंग अंग सारे तुझे
होते मला खुणावीत
सहजच ओठातुनी
शब्द गेला पटाईत !

–शब्द गेला पटाईत
हाच एक माझा गुन्हा
तुझा रागोबाही मला
परी फितूर आहे ना !

## ध्यास तृप्तीचा

माझे शब्द माझ्यापाशी
तुझे रुप तुझ्यापाशी
उन्मादक चांदण्याची
गेली संपून असोशी !

मृगजळी फुललेले
स्वप्न घेऊन उराशी
अर्थावाचून झुरले
भावनांचे भोळे पक्षी !

आता जीवनच व्हावे
एक दीर्घ मृगजळ
अतृप्तीच्या वर्षावात
ध्यास तृप्तीचा केवळ !

## फडफड

आता कुठे जागे झाले
माझे झोपलेले मन
स्वप्न सरून, सत्याचे
झाले प्रखर दर्शन !

दर्शनाचा सोहळा तो
माझ्या डोळा साहवेना
स्वप्नवेडचा अंतराची
फडफड आवरेना !

फूल उमलले तरी
आता कळीत मिटावे
माझ्या स्वराचे पाखरू
नादी आपुल्या घुमावे !

## तंद्रा

रात्र पसरिते काळी छाया
काळी झाली हिरवी गवते
उत्वेस घेउन पंख-पखेरू
तरुवर निजले सावध घरटे !

तुडुंब भरला तलाव निजला
जळावरी दाटली स्तब्धता
नुकती कोठे सुरु जाहली
रात किडयांची दीर्घ संहिता !

गावशिवेवर गोपुरातली
अता लागली पेंगू घंटा
पौरजनांची विझली घाई
आळस.... जांभई — उत्सुक निद्रा !

आकाशाच्या अथांगतेला
गर्भसुखाचे आले भरते
चमचमणारे स्वप्न बिलोरी
उमलुनि आले हल्लक, झुलते !

भरास आली मध्यरात्र ही
विश्वचि झाले विराट निद्रा
या पृथ्वीच्या कणाकणांतुनि
भिनली कसली अबोध तंद्रा !

## माझी पाटी–

सारे कसे स्तब्ध, शांत
नाही कुठेच रेघोटी
उभी, आडवी, चौकोनी
माझ्या जीवनाची पाटी

कधी वाटते परंतु
नटखट यावा कुणी
सारी पाटी उमलावी
दीर्घ, हट्टी रेघोटयांनी !

## आलीस अशी की–

आलीस अशी की
तुज खबर नसावी
आषाढातील कोसळणाऱ्या
प्रमत्त पाऊस धारांची

आलीस अशी की
तुज खबर नसावी
तांबुस लालस नासाग्रावरच्या
तरल हालत्या थेंबाची !

आलीस अशी की
तुज खबर नसावी
वेणीमधल्या –
किंचित् तिरप्या
फुलगजऱ्याच्या
खवचट .... मिस्किल हास्याची !

आलीस अशी की
तुज खबर नसावी
स्थळकाळाची ....
तुझी तुलाही ....

आलीस अशी ....
अन् जाणवले मज
होते वादळ ....
पावलात भिनलेली शक्ती ....
आसक्तीची वळवळणारी
नागीणपिले नेत्री ...
अन् जाणवली ओढ अनावर
तुझ्या उरातील
थडथडणाऱ्या
उष्ण ... लाल रक्ताची !

## मारवाड कन्या

गच्चीवरी उभी होती
कुणि मारवाड कन्या
तिच्या नाभीखाली जरा
होत्या लेहेंग्याच्या चुण्या !

तंग काचोळी अंगात
लाल मखमाली दुप्पट्टा
गौर गोंडस गळ्यात
लाल माणकांचा कंठा !

गाल मोहक रसीले
मुरमाच्या पुटकुळ्या
त्यात उठून दिसतो
एकुलता तीळ निळा !

बोटातील अंगठीचा
खडा डाळिंबी तेजाळ
रंगवील्या नखांचीही
काही आगळी झळाळ !

नजरेचा ताठा असा
तुच्छ सारे त्याच्यापुढे
आणि ओष्ठ-मिठीतील
शब्दांनाही मोल न्यारे !

सारा नगदीचा सौदा
नाही भलता उधार
श्रीमंतीचा.... यौवनाचा
भर नफ्यात व्यापार !

नवखा हा मुलुख ग
फार नको दावू तोरा
थोरी सावर दुप्पट्टा
वारा सुटला भरारा !

## अवखळा–

तुला न कळता
तुझिया वक्षी
गेला रेखुन
नाजुक नक्षी
हंसशुभ्र पक्षी,
वय चवदाला
ठेऊन साक्षी !

मुग्ध अशी कां
तूच अवखळा !
पाय विसरले
अल्लड चाळा,
हरिण बावरी
भुलली डोळां,
अशी अनोखी
ओढ कोणती
तुझ्या उरीच्या
फुलचिमणीला ?

## होरी

मिठी घातली वाटेने
चाल विसरले पाय
मन विचारू लागले
फूल फुलणार काय ?

मुग्ध, तरल काहीसे
भावजली लहरले
ठिबकले शब्द....शब्द
गंधगर्भ... रसबाळे !

भान उडाले देहाचे
मीच कृष्ण... मीच गोपी
आणि रंगांची पिचकारी
अंतर्बाह्य खेळे होरी

## सरले वादळ–

सरले वादळ, मेघ पांगले
पिसाट वारा थकुनि राहिला
कडाडणाऱ्या विजलीचाही
क्षणात् लवचिक कणा मोडला !

शिळंधार बरसात थांबली
क्रुद्ध जळाचे लोट थांबले
जना - वनाच्या संहाराचे
रौद्र, भयानक नृत्य थांबले !

निळी भरारी घेत उडाले
हर्षाने सम्राट स्वरांचे
लहरी लहरीतुनि आलापित
उदात्त, सुस्वर गीत मुक्तिचे !

बावरलेल्या तरु - लतिकांनी
सुटकेचा निःश्वास टाकला
अन् सूर्याने धरतीवरती
फेकियला किरणांचा शेला !

येइल आता खेळायला
उदास एकाकी माळावर
घराघरांतुनि दडुनि राहिली
बाळतृणांची 'सेना' सुंदर !

## या उलटचावर–

चुकचुकणारी पाल मनाची
भलता काही शकुन सांगते
इरेस पेटुन दैव, तरीही
उलटे करुनी पाय चालते

या उलटचावर टांगुन घ्यावे
सुलटे वटवाघूळ होउनी
अन् रात्रीचे मन रिझवावे
गंधर्वाची गीते गाउनी !

## अबोल–

ढळलेल्या सर्व खुणा
अभ्र - दाट सावल्यात
थिजलेले मौन उभे
होऊनिया जग विराट.

लक्ष नेत्र असुनि तरी
दिसत आंधळीच रात
दूर किती पथ अजून
विझलेली गति पदात !

हाक कुठे उमटेना
सादाविन क्षितिज शून्य
गेलेला शब्द उणा
भोंवताल अधिक खिन्न !

मी येथे - आणि तिथे
माझी मज साथ फक्त
थरथरती निःश्वसितें
एक हुंदका गळयात !

मिटलेली विश्वकळी
तिमिराचा डोह खोल
अंतरात लाख शब्द
आणि असा मी अबोल !

## स्वागत–

फाल्गुनातल्या
ऐन दुपारी
पाठ तापवित माळ पसरला
ऐसपैस पिवळा.
जपत उरातिल –
श्रावणातल्या झुळझुळणाऱ्या
रम्य कोवळ्या कळा.
हे नच कळते
जवळच्याच त्या तरुण वडाला.

आतुर असते त्याचे अंतर
चैत्राच्या मेण्यात बसुनी
वैभव अपुले –
मिरवित, झुलवित येणाऱ्या
यौवनगंधा धुंद पावलींचे
करण्या स्वागत !

फाल्गुनातल्या ऐन दुपारी ... !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

## श्रावणराणी–

फुलवेडी ही श्रावणराणी !

फुलाफुलांचे ल्याली पातळ
  फुलांचीच कंचुकी
धुतल्या केसावरी माळिली
  फुलांचीच वेणी
    फुलवेडी ही श्रावणराणी !

गाली... ओठी केसर चुरले
  सुशुभ्र दंतावली
केवडाच जणु भाल– तयावर
  गुलाबकलिका गुणी
    फुलवेडी ही श्रावणराणी !

पान–फुलांच्या गळ्यात माळा
  मणिबंधी फुलहार
दंडामध्ये फुलवाक्या अन्
  फुलझुमके कर्णी
    फुलवेडी ही श्रावणराणी !

पंख पालवित स्वैर विहरतो
  थवा पाखरांचा
फुलचोंचीतुन हिच्या रुपाची
  आलापित गाणी
    फुलवेडी ही श्रावणराणी !

तरुवेलींनी कळ्याफुलांच्या
  पायघड्या घातल्या
तयांवरुनि ही येत कामिनी
  मुजरे द्या लवुनी
    फुलवेडी ही श्रावणराणी !

झुलत, फुलत ही आली नाचत
  जणू कुणी भिल्लिणी
अून जाहले पिसे हिच्यास्तव
  खुणावते हांसुनी
    फुलवेडी ही श्रावणराणी !

## स्मृती–

डोईवर हिरव्याकंच गवताचा भारा
भाऱ्यात खोचलेला चकचकीत विळा ;
पायात खणखणारी जोडवी ;
खेड्यातील कुणी तरूणी –
जात होती बाजाराला गवताच्या –
त्या गवताचा
उग्र, अनामिक वास
शिरला नाकात,
नाकातून थेट पसरला डोक्यात
आणि
हळू हळू उलगडला
एकेक स्मृतीचा रेशमी गुंता … …
– होतो मी लहान.
आजीच्या काखेत बसून
जात होतो शेतावर.
शेताच्या बांधावर टोपली उपडी ठेवून
त्यावर बसवीत होती मला माझी आजी.
आणि आपण –
कापीत होती गवत खसाखसा.
दूर बांधावर चरत होत्या
म्हशी दोनच,
मी पहात होतो –
निळे आकाश – वाऱ्यावर डोलणारे शेत
रंगीबेरंगी फुलपांखरे …

म्हशीच्या पाठीवर बसलेला कावळा.
आणि मधुनच
दूरवर जाणाऱ्या आगगाडीचे नागमोडी वळण
कर्कश शिट्टी —

– संध्याकाळी परतताना घरी
मी काखेत,
डोईवर गवताचा भारा
आणि समोरुन संथपणे चालणाऱ्या म्हशी दोन.
मी राहातच नव्हतो
आईकडे अन् बाबाकडे.
आजीच्या मायेवरच पोसला आहे
माझा देह .... मन.
आता त्या साऱ्याच हिरव्या गडद स्मृतींचे
झाले आहे एक स्वप्न ...

– आज कधी
सुट्टीच्या दिवशी
जातो मी शेतावर
'तिला' बरोबर घेऊन
सोबत असतो चार वर्षाचा 'दीपक'
नेहरु शर्ट– लांब विजार– पायात बूट
अशी असते त्याची ऐट.
एक छोटीशी 'पिक्निक्'
जाताना–
मनात असते खूप काहीसे

हिरवी, आंबट ज्याची गोडी
रुंद बांध तो– बांध्यावरचे झाड जांभळाचे;
शांत, स्निग्ध सावली तयाची
शेतामधले खळे... गंजी पिंजराची–
अन् आठवते
पहिली वहिली
प्रीत रांगडी– शृंगार रांगडा
रानफुलांचा राकट गजरा
आजही असते तसेच काही
करायचे मजला–
इतुक्यामध्ये दाळचा पिटुनी
बाळ बोलतो,
'दादा दादा कूऽऽगाडी ती
झुक्.... झुक्.... झुक्'

क्षणात् आणिक
पुनश्च होतो लहान मी– बाळाइतुका
आठवते ती आगगाडी,
फुलपाखरे... म्हशीच्या पाठीवरचा कावळा–
निळे आकाश....

## मोहवेल–

मोहरली मोहवेल
आज माझ्या अंगणांत
मंद सुगंध तियेचा
दरवळे अंतरात !

हिर्वी, हळदुली कांती
जरा निस्तेज, फिक्कट
आहे सुस्ताई भरुन
देठा - पानांच्या नसांत !

स्पर्श होतांच वाऱ्याचा
तिचे थरारते अंग
काही आगळी जाणीव
झुऱ्या - बावऱ्या मनांत !

नाही मोहवीत तिला
शीळ मोहक चाफ्याची
भूल घालीना मनाला
रंग किमया उषेची !

दीस राती, आता उरी
एक प्रश्न – एक स्वप्न
उत्तराच्या प्रतिक्षेत
युग भासताहे क्षण !

कळी, पाकळीत आता
बीज, ब्रह्मांड साठले
सुख - लतिकेचे मूळ
वेदनेच्या कुळी आले !

## उदकाडी–

जळणारी उदकाडी
वेदनेचे लाल टिब
सार्थकता रोमरोमीं
अशी उच्छ्वसिते गंध !

उभ्या उभ्या जळताना
रम्य मृत्युच्या सोहळा
तळी उरलेली राख
तेच भस्म होय भाळा !

## करुण कहाणी–

पंज्या एवढा ढगाचा तुकडा
बघता बघता झाला आकाशभर
चुळकाभर पाण्याचा झाला
अफाट– अनंत– काळा सागर !

सकाळची झुळझुळणारी झुळुक
तीन प्रहरी सोसाटयाचा भन्नाट वारा.
पाला, पाचोळा. निर्माल्याचा
अंतराळात सुरु होत धिंगाणा सैरावैरा !

इकडून गारा– तिकडून मारा
कोसळणाऱ्या पाऊसधारा चहूं दिशांनी
लवलवणारी.... कडाडणारी
विजली गाते विध्वंसाची करुण कहाणी !

सुरक्षित, असुरक्षित– सावध, सारे बेसावध
सज्जात उभा मी निरखित
भिरभिरणारी– बावरलेली
एक गोजिरी चिमणी,
असहाय्य, व्याकूळ नजरेने
शोधते निवारा,
" ये ग, ये ग, चिमणाताई
मम हृदयाचा तुला आसरा."

## सोयरीक

वागविली खांद्यावर
तुझ्या भक्तिची पताका
ठसविली ओठावर
अलौकिक तुझी गाथा !

इथे धुळीत नाचली
पुण्यवंतांची पाऊले
धुळीचेच त्याच लेणे
भाग्य... मिरवितो भाळी !

तुझ्या नाम–कीर्तनाचे
ज्यांनी प्राशिले अमृत
तेच देव होऊनिया
उभे ठेले राऊळात !

अगा भगवंता ! तुझी
नको मला सोयरीक
जे जे पुढे गेले त्यांची
शुद्ध राहू दे ही वाट !

## किमया

फूल... फूल स्वप्न होते
तेव्हा होतीस अजाण
आज तूच एक फूल
तुझी तुला नाही जाण !

अंगोपांगी मोहरला
धुंद लाडका चंदन
गाली .. ओठी उतरली
मुग्ध लाजेची मालन !

भिगुरल्या पाऊलात
आता गती मंथरली
बंधनही गोड वाटे
अशी किमया आगळी !

रोज दिशा उमलती
आता फक्त तुझ्यासाठी
कंप स्वरास लाभता
नवी उमले रागिणी !

आणि कधी तुझे मौन
लक्ष अर्थ प्रसवते
लोचनात भावगर्भ
इंद्रधनू बहरते !

भयचकित पाखरु
मुक्त असुनी पिंजरा
हासणार कधी, कोण्या
भाग्यवंताचा उंबरा ?

## श्वासच होता

' साजणा,
मी दीप लाविला
तुझिया मार्गावरी.
अति अवघड आहे वळण–
तशातच
रात्र भयद अंधारी !'

" लाल केशरी
दीप्त प्रीतिची
फुललेली माझ्या नेत्री.
मी मृत्युंजय
उल्लंघुनिया येइन सहजच
विक्राळ भयानक दरी.'

' प्रिया,
मी श्वास धाडिला वायूसंगे
तुज वाट दाविण्या
नीट, थेट या इथली.'

' तू स्वयेच होतिस
चालत माझ्यासवे
अन् श्वासच होता तुझा
माझिया उरी !'

## लोभ–

वांझोटया आशांचे
बांझोटेच बी
वांझोटया भूमीत
दिले पेरुनी !

वरुषे लोटली
खुळाच तरी
म्हणतो फुटेल
कोंब कधीतरी

कोंब का येईना
बीज रुजेना
वांझोटया मनाचा
लोभ सुटेना !

## अन्तर्नाद–

कोळूनिया प्यालो सारे
संत, पंडित, महंत
परी नाही गवसला
माझा मला भगवंत !

रात्रंदिन धुंडाळले
सूर्य, तारका तेजात
– तारा ढळता पाहिला
नाही तिथेही शाश्वत !

करूनिया आलो सारे
देशाटन ... तीर्थाटन
सारा सोन्याचा मुलामा
भक्तिचे ना अधिष्ठान !

– आलो परतुनी पुन:
कोठुनी ही येत साद
हृदयीच्या हृदयात
तुझाच का अंतर्नाद ?

## शब्द —

एक शब्द माझ्यासाठी
एक शब्द तुझ्यासाठी
दोन शब्दांनी बांधाव्या
जन्मा-जन्माच्या या गाठी !

एक शब्द माझा उणा
एक शब्द तुझा उणा
शून्यातूनी आकारावा
तुझा माझा एकपणा !

## फक्त तेव्हा–

काही थोडे आठवावे
काही थोडे विसरावे
स्मृति–विस्मृतीच्या कोषी
सुखेनैव पहुडावे !

काही थोडे साठवावे
काही थोडे उधळावे
तृप्ति–अतृप्तिचे धागे
स्वतःभोवती विणावे !

अशा नेणतेपणाला
कुणि जीवन म्हणावे
आम्ही मात्र फक्त तेव्हा
ओठ मिटूनिया घ्यावे !

## अतृप्त मी–

कळो आले गा मजला
तुझे दान - माझे दैन्य
फाटक्याच झोळीतुनी
गळणारे पाप, पुण्य !

दाता देणारा तू असा
मी तो कंगाल भिकारी
निर्गुणाच्या भिक्षेसाठी
हिंडतसे दारोदारी !

ज्ञानीयाच्या समाधीचे
ठोठावले मुक्त द्वार
नाथ, तुका, नामयाला
पुशियला तुझा मार्ग

चार, दोन कण तेव्हा
हाती आलेसे वाटले
दिव्यत्वाचे काही क्षण
क्षण् दिपवून गेले !

अतृप्त मी पुन: उभा
कुठे तुजला धुंडाळू
फाटकीच माझी झोळी
कुठे कुठे टाके घालू !

## कागदाची फुले–

दिले होते दान तुला
भान विसरून
अमोलाचे मोल आज
फक्त एक शून्य !

उमलुनी एकदाच
मिटावे कळीने
प्रकाशुनी क्षणभर
विझावे ज्योतीने !

इतुकी का सोपी होती
एक... एक रात ?
खोटी... खोटीच का होती
प्रीतीची संगत ?

खोटीच का होती सारी
साखर पेरणी ?
गळ्यातील हात खोटा
खोटी संपादणी !

खोटा... खोटाच का होता
            सावल्यांचा खेळ ?
खोटेच का होते माप
            काळजाचा तोल !

–चुकीच ही झाली, तेव्हा–
            पुरा विश्वासून
दिली होती नाव माझी
            दर्यात सोडून.

वादळता आज दर्या
            चंद्र झाला वैरी
फेसाळून गेली सारी
            स्वप्ने भावभरी !

समाधान इतुकेच
            की आज कळाले
कांच–पुष्पपात्री होती
            कागदाची फुले !

## रंगोत्सव–

स्वप्नात सखी तो आला
अंगांगावर लाल केशरी रंग उधळुनी गेला.
निद्रेतच मी होते अजुनी
चोर पाउली हळुच येउनी
पिचकारीतुन रंगसरींचा वर्षावच जाहला
स्वप्नात सखी तो आला!

सलज्ज होऊनि उठले अवचित
चिंब जाहली तनू सावरित
तोंच मागुनी देहाभवती विळखा की पडला
स्वप्नात सखी तो आला!

अधर - मिठीचे होता मीलन
भान हरपले. मिटले लोचन
नसानसातुनि वसंतवेडा अनंग संचरला
स्वप्नात सखी तो आला!

आडदांड तरि किति हा साजण
नको तिथे ग ऽ करित दंतव्रण
जादुगिरी पण कशी – व्रणांचा होत क्षणी फुलझेला
स्वप्नात सखी तो आला!

मीही वेडी पुरती फसले
सर्वस्वाचे दान अर्पिले
देहच अवघा धुंद स्वरांच्या बरसातित नाहला
स्वप्नात सखी तो आला!

स्वप्न सरे ते – तरिही अजुनी
गंध बावऱ्या तनु - गात्रांतुनि
तो रंगोत्सव इंद्रधनूचे स्वप्न होउनी सजला
स्वप्नात सखी तो आला!

## असा कधीतरी

असा कधीतरी येतो
    कसोटीचा क्षण
कणा भंगतो पृथ्वीचा
    ढळे तारांगण !

विस्कटुनी जातो सारा
    उभारीचा डौल
दान टाकताच, येतो
    उलट्याच कौल !

कुठल्याशा जाणीवेने
    मौनावतो देह
होते मलाच पोरके
    दुखावले गेह !

वर्तमानाच्या उदरीं
    सलणारी कळ
भविष्याचे आश्वासन
    वांझोटे, निष्फळ !

अशा क्षणी आत कोठें
    जागणारा सूर
फक्त तेवढाच– आणि
    देह हो सतार !

## आज कुठे ती बेहोषी

एका बेहोषीत तेव्हा
लिहिली कविता
शब्द–सौंदर्याला आली
अर्थ–सघनता !

आगळीच काही तिच्या
रूपाची किमया
उभविली एक माझी
स्वप्नांची दुनिया !

कधी बनून चेटकी
आली झेपावून
कधी शालीन, लज्जीत
आली ओसंडून !

कधी भडकली उरीं
अंगार होऊन
कधी दुःखाश्रु सरीत
गेली विरघळून !

उसवुनि एक एक
टांका हृदयाचा
साजशेला विणियेला
असा भावनांचा!

हिच्या एका प्राप्तीसाठी
प्राशिले जहर
दण्य, लौकिक सुखाला
ठोकरीले दूर!

तेव्हा जीवनाला होता
लय, ताल, सूर
होते वेगळेच जग
वेगळाच नूर!

आज कुठे ती बेहोषी
आक्रंदते मन
मीच माझ्या कवितेचा
हन्त! केला खून

## कंटकांच्या या जगी–

कंटकांच्या या जगी मी फूलपण हरवून बसलो
सूर सारे राहिले अन् अंतरी कल्लोळलो.

लाविला पेला शराबी एकदा ओठावरी
विसरुनी गेली कशी ती अमृताची माधुरी.

रुक्ष सारे भोंवताली धुंद नजरा पाशवी
मोह घालीना मनाला तरु - लतांची पालवी.

सावरीले या करांनी दीन, दुबळ्या दुःखितां
ऊर का फोडीत नाही आज त्यांची आर्तता,

तप्त सूर्याच्या झळा या दाटलेल्या भोंवती
त्यात माझ्या भावनांची नित्य पडते आहुती !

कांचनाचा नाद ज्यांना फक्त होता ठाउकी
संगतीने मात्र त्यांच्या भाववीणा हो मुकी

झेलताना शब्द त्यांचा मी कसा पडलो फशी
अस्मिता माझी मला ना ओळखू आली कशी !

हा असा सहवास त्यांचा ; मी कसा पाषाणलो
पाखरांच्या वेदनेने ना कधी ओलावलो.

दंभ खोटा – मान खोटा – सर्व खोटे येथले
मोतियावाचून येथे रिक्त सारे शिंपले !

परततो आता पुनः मी भावविश्वी माझिया
लोळतो स्वानंद साम्राज्यी सुखाने लीलया !

## डंख

गरतीचा आव आणून तिची सावळी मूरत माझ्यापुढून गेली
तेव्हा माझ्या हृदयावरची एक खपली हळुवार अलगद उडाली!

चाल तिची अशी साळसूद की ताल कधी चुकलाच नाही
नजरेमधला भाव असा की पापणीचा पंखा कधी झुकलाच नाही!

पुनः पुनः सावरताना पदर; शालीनतेचा आव असा की
ऐसपैस पदराआडील काचोळीची गाठ कधी तुटलीच नाही!

रोमारोमात भिनलेले ते तेव्हाचे भानरहित धुसमुसळेपण
आणि देहधुंद गर्द मिठीत विरघळलेले तिचे नवथर कुंवारपण;

एक एक खूण तिची, माझ्या देहावर अजून ताजी जशी फूलकळी
आणि तरिही कधी पेटून निघतो तिच्या अशा दर्शनवेळी!

म्हटले होते हे क्षणाचे देणे व्हावे पुढील साती जन्माचे
काय कसे पण टोच मारुनी गेले पक्षी त्यावर 'त्याच' क्षणाचे!

दोन दिशांच्या मिठीत म्हटले वेल खुणेची येईल बहरून
पाचोळयाची रासच केवळ आली हाती ऋतुचक्रातुन!

अतृप्तीला वेढून असतो अजून, वादळवेडया तृप्तीचा हव्यास घेऊन
आणि तिची सावळी मूरत रोजच जाते नित्य नवा डंख मारून!

## थांबू नको–

कोणी कोणासाठी थांबत नाही
तू सुद्धा थांबू नको
वाटेवरच्या मुशाफिराला
अशी नजरेत बांधु नको !

दिशाहीन जीवनाची लक्तरे, माझ्या
कुशीचा निवारा मागू नको
चंद्र, सूर्य, तारे – सगळे खोटे
आत्म्याचा हावाला देऊ नको !

अर्धी अधिक चालून आल्यावर वाट
अर्धुल्या साथीने येऊ नको
तुझी उमलती पूर्ण पहाट
भलत्या आशेने कंजाळू नको !

फसव्या शब्दाच्या नटव्या मोहाने
जीवन माझे हे तोलू नको
क्षितिज वेडचा पाऊल गतीला
आसवांचा बांध घालू नको.

कोणी कोणासाठी थांबत नाही
तू सुद्धा थांबू नको
वाटेवरच्या मुशाफिराला
अशी नजरेत बाधू नको !

## सोनसंध्या

नारळीच्या पलिकडे
प्रकाशाचा शुभ्र झोत
पंख पिसारूनी कुणि
उभा मयूर डौलात!

निळ्या क्षितिज मंचकी
एकुलता मेघखंड
कुण्या विश्रब्ध राधेचा
अर्ध अनावृत्त दंड!

मधुनीच उडणारी
शुभ्र बगळ्यांची रांग
कुण्या अज्ञात कवीचे
भाव मधुर तरंग!

हळू हळू ये क्षितिजी
रंग गहिरे दाटुनी
कुण्या सन्यस्त ऋषीची
शुद्ध भगवी कौपिनी!

वातावरणी दाटले
काही धूसर धूसर
कुण्या अभिसारिकेची
अनामिक हुरहूर!

अशी सुभग सोज्वळ
सोनसंध्या कार्तिकीची
माझ्या स्वप्न–सावल्यांचा
सांधा.... सांधा जुळणारी!

## ही रीत तुझी–

नवखाच येथला प्रांत
नवख्याच येथल्या रीती
नवखाच तसा मीही गे
नवखीच आपुली प्रीती !

मी म्हटले तुज, 'ये आत'
तू म्हणालीस, 'चल रानी.'
मज जनरीतीची भीती
तू रानपऱ्यांची राणी !

मी नागर साधाभोळा
चांचल्य तुझे मैनेचे
मी पंखातच मिटणारा
शृंगार मुक्त तुज रुचे !

मी तराण्यात रमणारा
तू लकेर वाऱ्यावरची
मी संथ सागरापरी
तुज संगत रानझऱ्याची !

मी मलाच गे आपसूक
जखडून घेतले भंवती
सर्वस्व उधळुनी द्यावे
ही रीत तुझी ग नवखी !

या विरोधातही कैशी
ये जुळून आपुली प्रीती
चल मिठीत मिटूनी जाऊ
या दोन घडीच्या राती !

## विराणी

ओठ बंद केले तरी
डोळां फुटो नये पाणी
जाकी गोठून उरात
एक अनाम कहाणी !

स्वर हरवून गेले
शब्द जाहले फत्तर
कळ्यांतले–फुलांतले
गेले गोठून अत्तर !

माझे आकाश तोकडे
कळाहीन–दिशाहीन
श्रेय, प्रेय ना कुठेच
निष्फळाचे हे जीवन !

असा मौनदग्ध देह
चालतसे... चालतोच
दूर क्षितिज – तरीही
सोबतीला माझा मीच !

– ओठ बंद केले तरी
डोळां फुटो नये पाणी
कळो नये तुला कधी
माझी दुःखार्त विराणी !

## लाल मोहळ–

चंदेरी स्वप्नांना चूड लावून मी उठलो आहे
विझणार नाही ती आग, मी अंगार प्यालो आहे.

फुलांची, सुगंधाची मलाही होती अनिवार हौस
म्हटलीत मी गाणीं हळुवार शब्दांचे फुलवून घोस !

पांखरांची गाणीं – निर्झराचे संगीत – उषेचा लालीमा
पाहिला आहे मी प्रमदांच्या गालावरील लज्जित रक्तिमा !

आता वाटते हे वर्तुळ – वर्तुळातल्या घळलेल्या त्याच त्या वाटा
सगळेच काही खोटे होते – कदाचित् मीही खोटा

खोटयासाठी – खोटयामागे आलो चालत इतुका दूर
कसले नाव – कसले गाव, खोटा खोटाच लावला सूर !

पाहतो जेव्हा – फाटकी शरीरे, भकास नजरा, मेलेली मने
आणि ऐकतो – उंच महालात रंगलेले गझ्झल, तराणे –

पाहतो जेव्हा असत्याने उगारलेला काळा केसाळ हात सत्यावर ;
आणि ऐकतो – पिचलेल्या हाडातूत वाहणारा विव्हळणारा स्वर –

तेव्हा आत कुठेतरी स्त्रवते एक विश्वव्यापी करूणा
लज्जित शब्द – अवघ्या अस्मितेचा मोडून पडतो कणा !

शब्द .... शब्द आता ठिणगी – ठिणग्यांचेही गीत व्हावे
उठवून ठिणग्यांचे लाल मोहळ असे दिशात पसरावे !

## आठवते

धुँवाधार पासऊ कोसळताना
चिरेबंदी चौसोपी घरात
दारे... खिडक्या बंद करून
मऊ, उबदार पांघरुणात शिरताना
आठवते....

ते जुने कौलारू
ठेंगणे ठुसके, बसके घर.
अख्खी 'दमणी' जाईल
इतकी रुंद चौकट दर्शनी !
डाव्या बाजूचा रुंद कट्टा;
ऐसपैस माजघर-
भिंतीवर लटकणाऱ्या
देवाधर्मांच्या, पूर्वजांच्या तसबिरी,
भिंतीत बाराही महिने पूजा घेणाऱ्या
गणपतीचे कपाट.
एका कोपऱ्यात छोटेसेच देवघर;
देवघरात कधी-मधी घुशींनी-
बिळे काढून रचलेला मातीचा ढिगारा
पलिकडे स्वयंपाकघर.... न्हाणीघर.
संडास बिंडास कुछ नही....
त्यासाठी जवळच भुईकोट किल्ल्याचा खंदक !

धुँवाधार पाऊस कोसळताना–
आठवते ...
घराच्या परसा–दाराकडून
घरात शिरणारा लाल पाण्याचा लोट !
घुशींनी काढलेल्या बिळात पाणी शिरून
जमिनीला लागलेली डुंबळ.
पाण्यावर तरंगणारी
गाडगी, मडकी.
आणि मग
मिळतील ती भांडीकुंडी घेवून
उपसून टाकायचे पाणी.
त्यातही होती एक आगळी गंमत.

धुँवाधार पाऊस कोसळताना –
आठवते ...
बाहेर कोसळणाऱ्या पाऊसधारांचे
लयबद्ध संगीत.
आणि माजघरात
कंदिलाच्या मंद प्रकाशात
एकतारी .... टाळ ... डिमडीच्या गजरात
रंगलेले 'दत्ताचे' भजन.
आणि आठवते –
ऐन रंगात आले असताना भजन
विझू ... विझू आलेली कंदीलाची ज्योत.
आणि आश्चर्य ....
क्षणात् ज्योत झाली पुनः प्रज्वलित
कितीतरी वेळ .... कितीतरी वेळ.
भजन सरताच हलवून पाहिला कंदिल
केव्हाच सरले होते तेल.
तेवढाच एक अध्यात्मिक अनुभव
गाठीशी !

धुँवाधार पाऊस कोसळताना
आठवतात त्या रात्री
हळुवार मिठीत मिटलेल्या,
थरथरत्या स्पर्शाने मोहरलेल्या,
हळव्या सुगंधी श्वासात भिजलेल्या
देहमनावर रोमांच लेणे लेवून
नटलेल्या,
धुसमुसळ्या .... गाभुळल्या
फलभारे लवलेल्या ....

धुँवाधार पाऊस कोसळताना
आज –
विरघळून गेले ते
कौलारू घर ;
ते दिवस ... त्या रात्री
दिवसा रात्रीवर कोरलेला
प्रत्येय क्षण.
उरल्या केवळ
आंबट, गोड आठवणी
आणि
पिढ्या पिढ्यातून वाहणारा
भक्तिचा एकच सूर
फक्त तोच तेवढा
शाश्वत !

## हलाहल

नको तिथे मन जातें
पाहू नये तें पाहतें
हिरमुसलें होऊनी
पुन: घरटचात येते !

अशी रोजचीच त्याची
पाहवेना घालमेल
मुकेपणाचें म्हणुनी
घेतले हे हलाहल !

# शिव तुझे नाम ( संगितिका )

( इंद्रायणीच्या काठीं वसलेले देहू गाव. सायंकाळची वेळ. तुकारामाचे घर. घर साधेच आहे. पुढचा दरवाजा आतून बंद आहे. आत तुकारामाच्या बायकोने– अवलाईने– दळण घातले आहे. जात्याची अस्पष्ट घरघर बाहेर ऐकू येत आहे. त्या घरघरीतच अवलाईचे गीत मिसळले आहे. )

माझिया ग माहेराची लई आगळी पुण्याई
भोळा सांब देवा जसा माझा धनी.

पार्वतीचा गजानन यशोदेचा किस्न देव
तसा माझा ग लाडका महादेव.

माळ्याच्या ग बागेमंदी फुलामध्ये फुल जाई
माझी भाग्याची लाडाई काशीबाई.

परसदारी गोठ्यात म्हशी पुढती आंबोण
दह्या, दुधा तुपाला ग नाही उणं.

इंद्रायणीच्या देहूत माझ्या गरीबाच्या घरीं
चारी हातांनी लक्षुमी पाणी भरी.

( जात्याच्या घरघरीची लय वाढत जाते; तशी दारावर थाप पडते अवलाई दार उघडते. दारात छत्रपती शिवाजी महाराजांकडून नजराणा घेऊन आलेले सैनिक आहेत. त्यांच्या हातात वस्त्रालंकारांनी भरलेली सुवर्णताटे आहेत. )

**जिजाबाई** :– कोण रं तुम्ही बाबांनू ?

**एक सैनिक** :– आम्ही शिवाजी राजांचे सैनिक. महाराजांनी हा मानाचा नजराणा तुमच्यासाठी धाडला आहे. ( ताटे जिजाबाईसमोर ठेवतात. त्यावरील वस्त्रे दूर करतात. )

जिजाबाई :– ( डोळे विस्फारून नजराण्याकडे पहात ... ... )

अग बया... बया.... बया
खरेच का हो– खरेच का हे
सगळे आमच्यासाठी ?
( सैनिक होकार देतात )
खरेच म्हणतां ! कां ही थट्टा
येडा की खुळा तुमचा राजा
मलाच अथवा येड लागले–
काय तरी मी खुळी अशी ही
पहात बसले खुळ्यापरी
( सैनिकांना उद्देशून )
आहो, बसा या घडवंचीवर
खुळं आमचं गेलंय बाहिर
बाहीरून ते येईस्तोवर.
( ताटातील एकेक वस्तु पाहते )
हा शालू–हा खण जरतारी,
शाल कशी ही निळी भरजरी.
चोळबंद हे – कंबरपट्टा
तोडे, वाक्या, बाळ्या, बुगड्या
नथ मोत्याचा छान बाकडा...
अग बाई पण, कुठं गेली ही
दोन्ही पोरं
( दरवाजात येऊन हाळी देते )
आरं ऽऽ म्हादा ऽऽ– ये ऽऽ काशी ऽऽ—
कुठं खेळात गुंतलाय....
आरं.... याऽ रं ऽऽ... याऽ रं ऽऽ

म्हाद्या आणि काशी येतात. कपडे, दागिने, बघून नाचू लागतात. सगळींजण अंगावर कपडे चढवितात. दागिने घालतात. हर्षाने अवलाई फेर धरून गाऊ लागते.)

माझ्या ग ऽऽ माहेरची पावली मंगळाई
दळिदर दूर जाई पळूनिया,

( इतक्तात लांबून 'पांडुरंग... पांडुरंग' असा आवाज येतो. तुकाराम आत येतात. नटून, सजून उभ्या असलेल्या अवलाई, काशी, म्हाद्याकडे पाहतात. आणि आर्त कळवळ्याने उद्गारतात )

काय हे धाडीले तुम्ही पांडुरंगा
छळिता कां उगा भक्तांलागी.

नावडे जे चित्ता तेच पुरविता
हेत काय परता न कळेचि

चुकलो का देवा करतांना सेवा
परीक्षा आथवा साधकाची.

आहे हा मी ऐसा तैसाची राहू दे
प्रेम-सुख उणे पडो ने दी.

**तुकाराम** :– अवलाई, म्हाद्या, काशे– उतरा ते कपडे; ते दागिने. आम्हां वैष्णवाच्या घरी शब्द हेच धन. शब्द हीच रत्नें. एक विठ्ठल नामापुढे अनिकाची काय मातब्वरी. ( सगळींजण कपडे, दागिने काढून ठेवतात. आलेल्या सैनिकांना तुकाराम सांगतात.... )

चवरी, अबदागिरी छत्र, चामरे, सुवर्ण
आम्हां मृत्तिके सामान अवघेची.

विठ्ठलची आम्हा वस्त्रे विठ्ठलची ल्याले लेणे
हे तो फुकाचे देखणे काय कामा.

वैकुंठीची पेठ जिथे खुली आहे आम्हासाठी
तेथ तुमच्या राजाची काय मात ?

आता तुमच्या राजाला इतुकेच की सांगणे
राज्य करावे सुखाने महीवरी !

( तुकारामांचे हे अतुल वैराग्य पाहून – बाहेर खिडकीशी उभे असलेले शिवाजी महाराज चकित होतात. ते पटकन् पुढे येतात. तुकारामाच्या पायावर मस्तक ठेवतात .... )

**शिवाजी महाराज –**

पूज्य हे चरण आज मजला
शरणांगत मी नमित पदाला !

आज नयन हे धन्य जाहले
मूर्तिमंत वैराग्य देखिले
सात्विक, साधे भाव मुखावर नसे तयाला अन्य तुला.
पूज्य हे चरण आज मजला !

राज्यभोग, उपभोग सर्वही–
विषसम गमती वस्त्रें देही
राजचिन्ह हे नसे शिरावर, कंटक भासे मुकुट मला
पूज्य हे चरण आज मजला !

नश्वर तनु ही– नश्वर जीवित
नाम हरीचे एकच शाश्वत.
अष्टांगांनी भाव मनीचा तुमच्या मजला आकळला
पूज्य हे चरण आज मजला !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२७६८
दा. क. २३-६-५८
काव्य ५११
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)
REFBK-0023657

या चरणांशीं ठाव देउनी
मला रंगु द्या विठ्ठलनामीं
'विठ्ठल.... विठ्ठल' मंत्र एक हा, जीवन्मुक्ती त्यात मला
पूज्य हे चरण आज मजला !

( शिवाजी राजांचे दोन्ही बाहू धरुन उठवितात. )

तुकाराम –

'शिव तुझें नाम ठेविलें पवित्र
छत्रपती सूत्र विश्वाचें कीं'

काय सांगू तुज सर्वज्ञ तू एक
दुःखितांचे दुःख जाणावें वा.

वाढवावा जगीं कुळाचार धर्म
जाणोनी हें वर्म वर्तावें.

आत्म्याची वसती सर्वांभूतीं एक
कल्याण कारक राज्य व्हावें.

धन्य जन्म तुझा धन्य तुझी कीर्ती
त्र्यैलोक्य हें ख्याती नांदो तुझी !

( विठ्ठल नामाच्या गजरात तुकाराम व शिवाजी महाराज तल्लीन झाले आहेत. दोघांच्या समिश्र आवाजातील सूर दूर .... दूर जात विरुन जातात. )